# महाराष्ट्र शासन

E-mail: deskf10.rfd-mh@gov.in

क्र.एफएलडी-२०२२/प्र.क्र.३०९/फ-१०
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ७ डिसेंबर, २०२२

प्रति,

अपर मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर

विषय:- वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत कार्यकारी अभियंता, महापारेषण, नागपूर यांना २२० KV कळमेश्वर ते २२० KV वरुड दरम्यान ट्रान्समिशन लाईन टाकण्यासाठी नागपूर जिल्ह्यातील ६.०७६० हे. वनजमीन वळती करणेबाबत...

संदर्भ:- केंद्रस्थ अधिकारी यांचे पत्र क्र. कक्ष-१७/नोडल/नागपूर/ID-१३१७४/१८२०/२२-२३, दि. १५.१०.२०२२.

संदर्भाधीन दिनांक २७.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता, महापारेषण, नागपूर यांना २२० KV कळमेश्वर ते २२० KV वरुड दरम्यान ट्रान्समिशन लाईन टाकण्यासाठी नागपूर जिल्ह्यातील ६.०७६० हे. वनजमीन वळती करणेबाबत प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

२. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने खाली नमूद मुद्यांची माहिती शासनास तात्काळ उपलब्ध करुन द्यावी.

(१) सदर प्रकल्प वन्यजीव भ्रमणमार्गात येत असल्यामुळे, सदर प्रकरणी वन्यजीव मंजूरीची आवश्यकता आहे किंवा कसे याबाबत, प्रधान वनसंरक्षक (वन्यजीव) यांच्याकडून अभिप्राय घेऊन, त्याप्रमाणे माहिती सादर करावी.

(२) वनभंग झाला असल्यामुळे, दंडनीय नक्त वर्तमान मूल्य भरण्यास प्रकल्प यंत्रणा तयार असल्याबाबत हमीपत्र सादर करावे.

(३) केंद्रस्थ अधिकारी यांनी प्रकल्पासाठी प्रस्तावित केलेल्या वनक्षेत्राचा वैधानिक दर्जा "राखीव वने" असा नमूद केला आहे. परंतु, उपवनसंरक्षक, नागपूर यांनी त्यांच्या पार्ट-२ प्रमाणपत्रामध्ये वनक्षेत्राचा वैधानिक दर्जा "झुडपी जंगल" असे नमूद केले आहे. सबब, प्रस्तावित वनक्षेत्राचा

वैधानिक दर्जा "राखीव वने" आहे की "झुडपी जंगल", याबाबत खात्री करुन, आवश्यक त्या दुरूस्तीसह पार्ट-२ प्रमाणपत्र (ऑनलाईन व ऑफलाईन) सादर करावे.

(४) पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित केलेल्या क्षेत्राचा ७/१२ उतारा सादर करावा.

(गणेश जाधव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) मुख्य वनसंरक्षक (प्रा.), नागपूर

२) उपवनसंरक्षक, नागपूर